MHRG190007472023

:: भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ८४/२०२० मधील निशाणी क्र.३६ वरील आदेश ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे अर्जात दुरुस्त करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

०२. अर्ज व सामनेवाला क्र.३ यांनी निशाणी क्र.३८ वर दिलेले म्हणणे वाचले. अर्जदारतर्फे वकील श्री.बी.टी.नवाळे व सामनेवाला क्र.३ तर्फे सौ.वर्षा पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. अर्जदारचे कथन की, अर्जदारच्या मालकीची मौजे भोमजई, ता.महाड, जि.रायगड येथील मिळकत शासनाने नागेश्वरी धरणाकरिता अल्प बाजारभावाने संपादित केली. परिणामी, भुसंपादन अधिनियम, २८–अ(३) अन्वये संपादित मिळकतीचे योग्य मुल्य निर्धारण करण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दिला. अर्जदार यांनी मौजे भोमजई, ता.महाड, जि.रायगड येथील सर्वे नं.३३७, क्षेत्र ०–५५–७ आर.पॉ. या मिळकतीपैकी अर्जदार यांचा ५६.२५ टक्के म्हणजेच ३०९९.५ चौरस मीटर हिश्श्यापुरता सदरचा रेफरन्स अर्ज दाखल केलेला आहे. परंतु अवॉर्डमध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जदार यांनी मिळकतीचे वर्णन केलेले असताना मिळकतीमध्ये केवळ ५६.२५ टक्के म्हणजेच ३०९९.५ चौरस मीटर पुरताच हिस्सा आहे. तसेच अर्जदार हे त्यांच्या सदर संपादीत मिळकतीपोटी आवश्यक असणारा कोर्ट फी स्टॅम्प भरण्यास तयार आहे. अर्जदार यांनी मुळ

रेफरन्स अर्ज दाखल करतेवेळी परि.क्र.३ च्या दुस–या परिच्छेदामध्ये नमूद केलेला आहे परंतु परि.क्र.१ मध्ये मिळकतीचे वर्णन २८–अ(३) च्या अवॉर्डप्रमाणे केले आहे तसेच पान क्र.२ वरील कोष्टकामध्ये जी मागणीची किंमत व कोर्ट फी स्टॅम्पमध्ये दुरुस्ती करुन मिळणेकरिता सदरचा अर्ज दिलेला आहे. अर्जदार यांचेसोबत गावातील अन्य अर्जदारांचे अर्ज दुरुस्तीचे अर्जदेखील न्यायालयाने मंजुर केलेले आहेत. सदर आदेशाची प्रिंट काढतेवेळी पान नंबर चुकीचा टाकल्याने दुरुस्त प्रतीतील पान नंबर ९ वरील परिशिष्ट हे चुकीचे आलेले आहे.

०४. अर्जदारचे पुढे कथन की, रेफरन्सची अदयाप सुनावणी सुरु झालेली आहे परंतु सदरची महत्वाची दुरुस्ती करुन घेणे आवश्यक आहे. मागणीप्रमाणे रेफरन्स अर्जात दुरुस्ती करण्याची परवानगी दिल्यास सामनेवाल्यावर कोणताही अन्याय होणार नाही अथवा त्याच्या बचावास कोणतीही बाधा निर्माण होणार नाही. सबब, न्यायहितास्तव अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

०५. याउलट सामनेवाला क्र.३ यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदवुन सदर अर्जास योग्य व संयुक्तीक कारण नसुन अर्ज मुदतबाहय आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ रेफरन्स अर्जात अमुलाग्र बदल होवुन त्यांचे बचावावर विपरित परिणाम होणार आहे. परिणामी, अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

०६. उभयपक्षातर्फे करण्यात आलेल्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तावित मागणीव्दारे अर्जदार हे मुळ अर्जात दुरुस्ती करु पाहत आहे. अर्जातील मजकुर व प्रार्थना तसेच सामनेवाला यांनी कैफियतीमध्ये घेतलेला बचाव लक्षात घेता, सदरचा अतिरिक्त मजकुर अर्जदारास प्रस्तावित दुरुस्तीने समाविष्ट करण्याची परवानगी दिल्यास सामनेवालाच्या बचावावर

कोणताही परिणाम होणार नसल्याचे दिसुन येते. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ रेफरन्स अर्जाच्या स्वरुपात तथा प्रार्थनेमध्ये कोणताही बदल होणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीची अर्जदारास परवानगी दिल्यास सामनेवालाचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारने पुढील तारखेपर्यत मागणीप्रमाणे अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करण्याचे आदेशित करण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA
Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.03.24 11:38:35 +0530

महाड,
दिनांकः२३.०३.२०२६

(**श्रीमती एच. आर. जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड